# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक १७

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक २२/०५/२०२५ दुपारी ५-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ५. | श्री.बाळासाहेब तट्टू | मुख्यलेखाअधिकारी |
| ६. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| ९. | श्री नवनीत सोनवणे | कार्य. अभियंता |
| १०. | श्री एम आर शेख | आरोग्याधिकारी |
| ११. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| १२. | श्री संजय मोरे | अधिक्षक आस्थापा विभाग |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १५. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १६. | श्री गितेश सोनार | कनिष्ठ अभियंता , विद्युत विभाग |
| १७. | श्री.निखील टकले | कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग |
| १८. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २०. | श्री राजेश गायकवाड | लिपीक शिक्षणमंडळ |
| २१. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २२. | श्री सुर्यकांत हजारे | बाजार विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१५२ मागील प्रशासकीय महासभा क्र.१४, १५ व १६ सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक मागील प्रशासकीय महासभा क्र.१४, १५, व १६ सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५२ दिनांक २२/०५/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक १४ दिनांक २१/०३/२०२५च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १३४ ते १४० अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच मागील प्रशासकीय महासभा क्रमांक १५ दिनांक २३/०४/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १४१ ते १४७ व प्रशासकीय महासभा क्रमांक १६ दिनांक ०६/०५/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १४८ ते १५१ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५३ धुळे शहरातील तीर्थस्थळ तथा पर्यटन स्थळांना "क" दर्जा प्राप्त होण्याच्या अनुषंगाने त्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे शहरातील तीर्थस्थळ तथा पर्यटन स्थळांना क दर्जा पा्रप्त होण्याच्या अनुषंगाने मनपा स्तरावर योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे प्रस्ताव सादर करणेबाबत मा. आमदार श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांनी पत्र दिले होते. त्यानुसार सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा ठराव करुन नियोजन मंडळाकडे जाईल व त्यानंतर आवश्यक ती कार्यवाही होईल. ठराव करुन पुढील कार्यवाही करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५३ दिनांक २२/०५/२०२५**

धुळे शहरातील खालील सुचविलेल्या तीर्थस्थळ तथा पर्यटन स्थळांना "क" दर्जा प्राप्त होण्याच्या अनुषंगाने महापालिका स्तरावर योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव माननिय जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे प्रस्ताव सादर करणेबाबत मा.आमदार श्री. अनुप (भैय्या) ओमप्रकाश अग्रवाल, आमदार, धुळे शहर यांनी खालील नमुद धार्मिक स्थळ तथा पर्यटन स्थळांना "क" दर्जा प्राप्त होणेबाबत मागणी केलेली आहे.

| अ.क्र. | धार्मिक स्थळ | अ.क्र. | धार्मिक स्थळ |
|---|---|---|---|
| १ | सिध्देश्वर गणपती मंदिर- शिवाजी रोड धुळे | १९ | महाकाली मंदीर, शिवाजी रोड |
| २ | पंचमुखी हनुमान मंदीर, शिवाजी रोड | २० | नारायणबुवा समाधी ,गांधी पुतळा |
| ३ | साई बाबा मंदिर, समता नगर | २१ | समर्थ वागदेवता मंदीर, मालेगांव रोड |
| ४ | तुळजा भवानी मंदिर, समता नगर | २२ | सुर्यमंदीर पाठशाळा, चाळीसगांव रोड |
| ५ | गणपती मंदिर, सहजीवन नगर | २३ | संतोषीमाता मंदीर, शिवतीर्थ |
| ६ | गणपती मंदिर, अवधान निंबानगर | २४ | सोन्या मारुती मंदीर, मिल परीसर |
| ७ | महादेव मंदिर, कोळवले नगर | २५ | गुरुद्वारा, आग्रा रोड |
| ८ | पिंपळादेवी मंदिर, मोहाडी उपनगर | २६ | महाकाली / महादेव मंदीर मोहाडी उपनगर |
| ९ | शिव मंदिर, संभाप्पा कॉलनी | २७ | दशामाता मंदीर, हुडको पवननगर |
| १० | नारायणी धाम, भाईजी नगर | २८ | दक्षिणमुखी हनुमान मंदीर, ऊसगल्ली |
| ११ | श्री स्वामी समर्थ केंद्र, मिलपरीसर | २९ | दक्षिणमुखी हनुमान मंदीर, राष्टवादी भवन समोर |
| १२ | पंचवटी महादेव मंदीर, देवपूर | ३० | सुर्यमुखी हनुमान मंदीर, अलंकार सोसायटी |
| १३ | गजानन महाराज मंदीर मिलपरीसर | ३१ | खंडेराव मंदीर, बाराफत्तर |
| १४ | नागेगश्वर महादेव ,पारोळा रोड | ३२ | जय श्रीराम हनुमान मंडळ,हमाल मापाडी प्लॉट बजरंगवाडी |
| १५ | श्री प्रसन्न हनुमान मंदीर, पवन नगर, मार्केट | ३३ | खुनी गणपती मंदीर, जुने धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| | यार्ड | | |
| १६ | श्रीराम मंदीर, गल्ली नं ४ | ३४ | श्री बालाजी मंदीर, गल्ली नं. ४ |
| १७ | श्रीमंती गणपुले दत्त मंदीर, गल्ली नं. ४ | ३५ | चंडिका माता मंदीर, चंडीका नगर बिलाडी रोड |
| १८ | श्री दक्षिणमुखी मारोती मंदीर, ग. नं. १२ जुने धुळे | ३६ | महादेव मंदीर, हरीओम कॉलीन मिल परीसर |

सदर धार्मिक मंदीर व तिर्थस्थान हे शहरातील महत्वाची धार्मिक केंद्र व आध्यात्मीक केंद्र असुन सदर ठिकाणी वर्षभर सातत्याने धार्मिक व सामाजीक उपक्रम राबविण्यात येतात. व सदर ठिकाणी वर्षभर भावीकांची वर्दळ असते. यातील नारायणबुवा मंदीर व पंचमुखी हनुमान मंदीर हे देवस्थान सुमारे १०० वर्षापूर्वीपासून अस्तित्वात आहे.

उक्त मधील शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडी एस -2010/8/ प्र.क्र.463/पर्यटन दि.4/11/2010 नुसार 'क' श्रेणीसाठी पर्यटन स्थळांची निवड जिल्हा नियोजन समितीने करावयाची आहे व त्यासाठीची तरतूद हि जिल्हास्तरावरूनच करून घ्यावयाची आहे असे नमूद आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, नमुद १ ते ३६ धार्मिक स्थळ तथा पर्यटन स्थळांना 'क' वर्ग पर्यटन स्थळ म्हणून दर्जा मिळणेसाठी म.जिल्हा नियोजन समितीस प्रस्ताव सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५४ धुळे मनपा हद्दीतील अवधान उपनगर येथे असलेल्या दशनाम गोसावी समाजाच्या दफनभूमीस संरक्षण भीत बांधणे व स्ट्रीट लाईट निर्माण करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मनपा हददीत अवधान उपनगर येथे दशनाम गोसावी समाजाची दफनभुमी आहे. दफनभुमीची अवस्था खराब आहे. अंत्यविधी संस्कार करण्यासा त्या समाजाच्या नागरीकांना अडचणी येत आहे. याबाबत मा. आमदार महोदयांनी पत्र दिले आहे. दफनभुमीला संरक्षक भिंत तसेच स्ट्रीट लाईटकामी साधारणत: ५० लक्ष खर्च येणार आहे. सदर निर्णय हा धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर जागेचा उतारा तपासुन घ्या. तसेच जिल्हा नगरोत्थान किंवा दलितेतर मधुन निधी उपलब्धतेबाबत प्रस्ताव पाठवावा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५४ दिनांक २२/०५/२०२५**

मनपा हद्दीत अवधान उपनगर येथे दसनाम गोसावी समाजाची दफनभूमी असून सदर दफनभूमीची अवहेलनात्मक स्थीती झाली असल्याने अंत्यविधी संस्कार करण्यास त्या समाजाच्या नागरिकांना अडचणी येत आहेत.

दशनाम गोसावी समाजाचे शिष्टमंडळाने मा. श्री.अनुप ओमप्रकाश अग्रवाल , आमदार , धुळे यांना प्रत्यक्ष भेटून तेथील स्थीतीची कैफीयत स्पष्ट केली असून सदर दफनभूमीला संरक्षक भींत बांधावी व स्ट्रीट लाईट बसविण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसेच याविषयी दसनाम गोसावी समाजाच्या नागरिकांनी भेटून उपाययोजना करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

उक्त बाबत दसनाम गोसावी समाजाच्या दफनभूमीस संरक्षण भिंत बांधणे व स्ट्रीट लाईट निर्माण करणे ही कामी अंदाजे रक्कम रु.50 लक्ष चा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील निर्णय हा धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा हद्दीतील अवधान उपनगर येथे असलेल्या दशनाम गोसावी समाजाच्या दफनभूमीस संरक्षण भीत बांधणे व स्ट्रीट लाईट निर्माण करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. प्रथम सदर जागेच्या मालकी हक्काबाबत प्रथम खातरजमा करावी. तसेच याकामी जिल्हा नियोजन मंडळ तथा शासनस्तरावर निधी मागणी प्रस्ताव करणेत यावा.वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५५ धुळे मनपा मालकीचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील मटन मार्केटचे १ ते १० गाळे भाडेतत्वावर देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. सहा.आयुक्त धुळे मनपा मालकीचे अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल आहे. तेथे १ ते १० गाळे मटन दुकानासाठी राखीव आहे. यासाठी वेळोवेळी निविदा काढल्या असुन त्यात कोणी सहभाग घेत नाही. तसेच सन २०१३ मध्ये मे. महासभेने ठराव केला होता की विनापरतावा अनामत रक्कम घ्यावी. यासाठी इच्छुकांनी अर्ज केला आहे. नगररचना विभागाकडुन दर मागविण्यात येवुन ते साधारणत: २३७२/- ते २४५२/- याप्रमाणे आहे. इच्छुकांनी ड्रेनेज,पाणी, स्वच्छता, वीज, शौचालय उपलब्धतेबाबत मागणी केली आहे. तसेच डिपॉझिट रिफंडेबल करावे अशी मागणी केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात डिपॉझिट घेणे जरुरीचे आहे. डिपॉझिट रिफंडेबल करुन टाकु. ठरलेल्या दराप्रमाणे वर्कआऊट करुन घ्या. आता किती गाळे शिल्लक आहेत त्या ठिकाणी.

मा.सहा.आयुक्त ५० गाळे आहेत. उर्वरीत सर्व दुकानांची निविदा काढुन दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक परिसर स्वच्छ करुन कंपाऊंड वॉल करुन हे बसविले तर त्या परिसराची परिस्थिती सुधारेल. उघडयावर मटन विक्री करतात त्यांना नोटीसा द्याव्या. साक्रीरोड येथे ही ओटयांची डागडुजी करुन घ्या. तेथे मासे विक्री करणाऱ्यांना बसवा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५५ दिनांक २२/०५/२०२५**

श्री. यश दिपक साळुंखे व श्री. सुहास नवल निकम, रा. धुळे यांनी दि. ११-४-२०२५ रोजी अर्ज देऊन धुळे मनपा मालकीचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील मटन मार्केट मधील १ ते १० गाळे प्रतिगाळा रू. २०००/- मासिक भाडे व एकरकमी १ लाख रूपये (Refundable Deposit) भरून तसेच सदरचा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा जसे गटार (ड्रेनेज), पाणी पुरवठा, प्रवेशद्वार, वीज, शौचालय, पाण्याची टाकी, सुरक्षा जाळ्या इ. उपलब्ध करून मिळाल्यांस सदर गाळे भाडेतत्वावर मिळणेबाबत लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे.नगररचना विभागाकडुन दि. ०९-०५-२०२५ रोजीचे प्राप्त पत्रानुसार रेडिरेकनर दर व अनामत रक्कम दर प्राप्त झालेले असुन त्यानुसार मटन मार्केट येथील २ ते ९ या गाळयांचा आरक्षण व इतर तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | आरक्षण | दुकान नंबर | दुकान क्षेत्रफळ | प्रति चौ.मी दर | मासिकभाडे | वार्षिक भाडे | ना परतावा अनामत रक्कम (२६८०० प्रति चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जनरल करिता | २ | ८.८५ | २६८ | २३७२ | २८४६४ | २३७१८० |
| २ | जनरल करिता | ३ | ९.२४ | २६८ | २४७६ | २९७१२ | २४७६३२ |
| ३ | जनरल करिता | ४ | ९.१५ | २६८ | २४५२ | २९४२४ | २४५२२० |
| ४ | जनरल करिता | ५ | ९.१५ | २६८ | २४५२ | २९४२४ | २४५२२० |
| ५ | जनरल करिता | ६ | ९.८८ | २६८ | २६४८ | ३१७७६ | २६४७८४ |
| ६ | जनरल करिता | ७ | १०.९० | २६८ | २९२१ | ३५०५२ | २९२१२० |
| ७ | जनरल करिता | ८ | ९.०६ | २६८ | २४२८ | २९१३६ | २४२८०८ |
| ८ | बेरोजगारसंस्था | ९ | ९.२१ | २६८ | २४६८ | २९६१६ | २४६८२८ |
| ९ | जनरल करिता | १० | ९.१५ | २६८ | २४५२ | २९४२४ | २४५२२० |
| **एकुण** | | | | | **२२६६९** | **२७२०२८** | **२२६७०१२** |

अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील रिक्त असलेल्या मटन मार्केट गाळयांबाबत वेळोवेळी बंद पाकिटातुन व ई ऑक्शनद्वारे निविदा काढुन देखील ठराविक गाळयांकरिता

कोणीही निविदेत भाग घेत नाही किंवा प्रतिसाद देत नाही तसेच उक्त ठिकाणी परिसरातील नागरिकांद्वारे मोठया प्रमाणांत अस्वच्छता करण्यांत येते.

सदर गाळयांची डिपॉझिट ही धुळे मनपा ठराव क्र. २०७ दि. २८-८-२०१३ नुसार विनापरतावा घेणेस मंजुरी मिळालेली आहे त्यानुसार रस्तालागुन असलेली दुकाने भाडे तत्वावर देण्यांत आलेली आहेत व काही शिल्लक आहेत.आतील बाजुस बांधणेत आलेली ४० भाजी व्यवसायासाठी मंजुर असलेली व १० मटन व्यवसायासाठी मंजुर असलेली दुकाने तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार विनापरतावा डिपॉझिट भरून घेण्यांस प्रतिसाद देत नाही.तसे अर्जदार यांनी एकत्रीत १ ते १० मटन दुकाने सोई सुविधा उपलब्ध करून दिल्यांस परतावा डिपॉझिट (Refundable Deposit) नुसार मिळावे अशी विनंती केली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा मालकीचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील मटन मार्केटचे १ ते १० गाळे श्री. यश दिपक साळुंखे व श्री. सुहास नवल निकम, रा. धुळे यांना नगररचना विभागाने निश्चीत केलेल्या वार्षिक भाडे व परतावा डिपॉझिट घेऊन देणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा आवश्यक तो करारनामा संबंधितांकडून करुन घेणेत यावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५६ — सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी प्रस्ताव सादर करणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता — केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजनेअंतर्गत सन २०२५-२६ साठी मा.आमदार महोदय यांनी सदरचा विषय पत्राव्दारे ठेवला होता. त्यासाठी १ ते ९ कामांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर प्रस्ताव हा मा. संचालक नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, पुणे व मा. सह सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविणे कामी मे. महासभेच्या ठरावाची आवश्यकता आहे. त्यासाठी सदरचा विषय हा मे. महासभेपुढे ठेवण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — पुढील कार्यवाही करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५६ दिनांक २२/०५/२०२५**

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत सन 2025-2026 या वर्षात विकास योजना अंमलबजावणी अंतर्गतच्या बिनव्याजी कर्जासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | धुळे शहरातील संतोषी माता मंदिर ते विठ्ठल मंदिर रस्ता कॉक्रीटकरण करणे | रु.२९,९९,९८,२७२/- |
| २ | धुळे शहरतील सर्वे नं. ७३/४ वलवाडी येथील नं. ५० राखीव जागेवर भाजी मार्केट आणि दुकाने बांधकाम करणे | रु.१५,६६,३९,०९९/- |
| ३ | धुळे शहरातील जुन्या धुळे महानगरपालिकेतील जागेवर प्रशासकीय कार्यालये व दुकाने बांधकाम करणे. | रु.२४,९९,७४,२६४/- |
| ४ | धुळे शहरातील ८० फुटी रोड येथील गट नं. ३ भाग २ येथे सावता माळी कॉम्प्लेक्स बांधकाम करणे | रु.१६,००,५३,३२३/- |
| ५ | धुळे शहरातील नवीन महानगरपालिका येथील रिकाम्या जागेवर इमारत क्र. ४ चे नवीन बांधकाम करणे. | रु.२४,९९,८०,७७४/- |
| ६ | प्रभाग क्र. १८ मधील मोहाडी येथील अरिहंत नगर बोर्ड ते म्हाडा बिल्डींग पावेतो सिमेंट कॉक्रीट रोड करणे | रु.१,९९,०५,३४५/- |
| ७ | प्रभाग क्र. १८ मधील मोहाडी येथील रेल्वे स्टेशन ते डॉ. आंबेडकर कॉलनी पावेतो सिमेंट कॉक्रीट रोड करणे | रु.१,८४,३३,९५५/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | प्रभाग क्र. १५ सिंचन भवन ते पंचशील ग्राउंड पावेतो सिमेंट कॉक्रीट रोड करणे | रु.२,९२,६४,९८२/- |
| ९ | साईदर्शन कॉलनी डी.पी. रोड लगत श्री.भैय्या पाखले ते गवळी यांचे घरापावेतो कॉक्रीटरस्ता करणे | रु.१,००,००,०००/- |
| | **एकूण** | **११९,४२,५०,०१४/-** |

वरीलप्रमाणे रक्कम रु.119,42,50,014/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी वरील कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे कामी मा.संचालक नगररचना व मूल्य निर्धारण विभाग , पुणे व मा. सह सचिव , नगरविकास विभाग मंत्रालय , मुंबई- 400 032 यांच्या कडे पाठविणे कामी मे.महासभेच्या ठरावाची आवश्यकता आहे. त्यास्तव सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी वरील १ ते ९ कामांसाठी रुपये 119,42,50,014/- मात्रचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे तथा शासनाकडे सादर करण्यास मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५७ अमृत 2.0 अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना (टप्पा क्र.2) कामासाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना" अंतर्गत कर्ज उभारणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता अमृत २.० अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजनेची निविदा मागविण्यात आली होती. सदर योजनेत मनपा हिस्साकरीता नागरीक पायाभुत सुविधा विकास निधी (UIDF) अंतर्गत अपात्र ठरत असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्पातील स्वहिश्याची रक्कम उभारण्यासाठी महाराष्ट्र नागरी पायभुत सुविधा विकास कर्ज योजना अंतर्गत कर्ज अनुज्ञेय राहिल असे संदर्भीय शासन निर्णयात नमुद आहे. ५०० कोटीच्या आत जर आपला हा प्रस्ताव राहिला असता तर UIDF कर्ज मिळाले असते. परंतु प्रस्तावाची रक्कम ५०० कोटी च्या वर असल्याने सदरचा प्रस्ताव हा महाराष्ट्र अर्बन इन्फ्रा. डेव्हलपमेंट कं. लि. यांचेकडे सादर केलेला आहे. यात समजा मंजुरी मिळाली जसा जसा हिस्सा लागेल तसे तसे त्यांच्याकडुन मान्यता घेवु.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपल्याला लिबर्टी राहिल असा प्रस्ताव द्यावा लागेल. दोन तीन टप्प्यात त्याचे पैसे रिलीज करावे आणि लोन फक्त मंजुर करुन ठेवावे. जसे आपल्याला लागतील ते उचलण्याची मुभा रहावी. ते व्यवस्थित प्रोसेस करुन घ्या.सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५७ दिनांक २२/०५/२०२५**

अमृत 2.0 अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना ( टप्पा क्र.2) योजनेस शासन निर्णय क्र. अमृत-२०२३/ पत्र क्र.397 /नवि-33/ दिनांक - 17/10/2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. उक्त योजनेची आवश्यक ती निविदा प्रक्रिया करून कार्यादेश मे.जयंतीसुपर कन्स्ट्रक्शन प्रा.लि. ॲन्ड एन्विराड प्रा.लि. (JV) मेहसाना , गुजरात यांना शे.12.24% जादा दराने या कार्यालया कडील आदेश क्र. धुमपा / बां.वि./ 342 दि.14/10/2024 अन्वये देण्यात आलेला आहे.उक्त बाबत सदर कामी योजनेवर एकूण एकत्रित खर्च रु ८२३,६४,६९,४०० /-अपेक्षित आहे.

उक्त प्रमाणे वरील योजनेसाठी नागरी पायाभूत सुविधा विकास निधी (UIDF) अंतर्गत कर्जाची मागणी केली असता सदर योजने अंतर्गत अपात्र ठरत आहे. नागरी पायाभूत सुविधा विकास निधी (UIDF) अंतर्गत अपात्र ठरत असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्पातील स्वहिश्श्याची रक्कम उभारण्यासाठी "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना" अंतर्गत कर्ज अनुज्ञेय राहील असे शासन निर्णयात नमूद आहे.

उक्त बाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत मंजूर प्रकल्प /कामातील स्वहिश्याचा निधी उभारण्याकरिता महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर

डेव्हलपमेंट कं. लि. (MUIDCL) / महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड (MUIF) मार्फत खुल्या बाजारातून सार्वजनिक अथवा खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारून तो निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज स्वरूपात उपलब्ध करुन देण्यासाठी "महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना" राबविण्याची बाब विचाराधीन होती, त्याबाबत शासन निर्णय पारीत झालेला आहे.

अमृत 2.0 अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना ( टप्पा क्र.2 ) अंतर्गत वित्तीय आकृतीबंधानुसार शासनाकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते तसेच, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील सदर प्रकल्पांसाठी स्वहिश्याचा निधी उपलब्ध करुन द्यावा लागतो.

तथापि धुळे महानगरपालिकेची कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे स्वहिश्याचा निधी तातडीने गुंतविणे शक्य होत नाही. केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर केलेले प्रकल्प निधी अभावी रखडून प्रकल्प किंमत वाढू नये यासाठी प्रकल्पांना वेळेत आवश्यक अर्थपुरवठा केल्यास Financial Closure दिल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन नागरिकांना देखील सदर पायाभूत सुविधांचे प्रत्यक्ष लाभ देखील वेळीच मिळवून देणे शक्य होणार आहे.

या पार्श्वभूमीवर, नागरी धुळे महानगरपालिकेची स्वहिश्याचा निधी उभारण्यासाठी “महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना” अंतर्गत कर्ज उपलब्ध होणे करिता वरील शासन निर्णयातील अटी शर्ती मान्य करणे कामीचा विषय हा धोरणात्मक असल्याने मे.महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार अमृत 2.0 अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना (टप्पा क्र.2) कामासाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना” अंतर्गत कर्ज उभारणे साठी शासन निर्णयातील अटी शर्ती नुसार प्रस्ताव सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५८ — घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकी करीता नव्याने ई-निविदा प्रसिद्ध करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. मु.स्व्. निरीक्षक — मे. महासभा ठराव क्रं ३७ दि.२५/७/२०२४ नुसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीकरीता १ वर्षासाठी निविदा करणेबाबत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार १ वर्षाकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु दि. १४/१/२०२५ रोजीच्या मंजुर टिपणी नुसार सदर निविदा अंदाजपत्रकात नाही त्यात आवश्यक बदल करणेसाठी व सुधारित तांत्रिक मान्यता मिळणेकामी निविदा रदद करण्यात आली होती. त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन ३ वर्षाकरीता सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — पुर्वीच्या ठेकेदाराने काय केले सर्वांना माहित आहे. ३ वर्षासाठी योग्य होणार नाही. तांत्रिक मान्यतेमध्ये गाडया पुरविणेसाठी कॉम्पोनंट टाकले आहे का. समजा ३ वर्ष कालावधीचे टेंडर केले व बॉडी आल्यावर त्यांनी रदद करणार नाही या शाश्वती आहे का. साक्रीरोड भागात गाडया जात नाही. तेथे नेहमी तक्रारी येत असतात. त्या भागात दररोज गाडी गेली पाहिजे. गाडया सर्व रिपेअर करुन घ्या. गाडया ज्या चिखलामुळे भागात जात नाही. त्या भागात १ टॅक्ट्रर येईल हे पहावे. पावसाळयात वलवाडी भागात चिखलामुळे गाडया जात नाही. याकरीतादेखील टॅक्ट्रच कामी येतील. स्वच्छ महाराष्ट्र मिशन मधुन आलेले ४ टॅक्ट्रर आहेत. त्यासाठी ४ ट्रॉली विकत घ्यावा. याचे टेंडर प्रोसेस करुन घ्या. या विषयाबाबत ई निविदा ३ वर्ष न करता २ वर्ष कालावधीकरीता करावी. नविन कौन्सील अस्तित्वात आल्यानंतर पुढील निर्णय होईल. सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५८ दिनांक २२/०५/२०२५**

मे.महासभा ठराव क्र.37 दि.25/07/2024 नुसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकी करीता 01 वर्ष साठी निविदा करणे बाबत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ई-निविदा सूचना क्र.134 दि.03/01/2025 द्वारे 1 varsha करिता निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु दि.14/01/2025 रोजीच्या मंजूर टिपणी नुसार सदर निविदेच्या अंदाजपत्रकात काही आवश्यक बदल करणे साठी व सुधारित तांत्रिक मान्यता मिळणे कमी सदरची निवीदा रद्द अरण्यात आली होती.

त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून 3 वर्ष मुदती करिता निविदा करणे साठी रक्कम रु.54,75,76,686/- मात्र ला मा.कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे. त्यानुसार दिनांक 14/01/2025 रोजी च्या मंजूर कार्यालय टिपणीनुसार नव्याने घनकचरा संकलन व वाहतुकी करीता नव्याने ई-निविदा प्रसिद्ध करण्यास माननीय आयुक्त तथा प्रशासक यांनी मान्यता दिली असून, योग्य निर्देशानुसार निविदा प्रपत्र तयार करण्यात आले असून सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे (as per DSR) निविदा प्रक्रिया 3 वर्ष कालावधीसाठी असणे बाबत माननीय आयुक्त तथा प्रशासक यांनी निर्देशित केल्याप्रमाणे तीन वर्षे करिता निमित्त प्रसिद्ध करण्यास मान्यता मिळवून तसे मे.महासभेचा ठराव करणे आवश्यक असून येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्यास कामी सदरचा विषय धोरणात्मक निर्णयासाठी मे. महासभे पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकी करीता नव्याने २ वर्ष कालावधीसाठी ई-निविदा प्रसिद्ध करणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५९ — स्वच्छ महाराष्ट्र अभियान (२.०) अंतर्गत धुळे शहरातील दैनंदीन संकलन होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याबाबतच्या सुरु असलेल्या कामास मुदतवाढ देणे बाबात आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु.स्व. निरीक्षक — स्वच्छ भारत अभियान २.० च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतगत कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि प्रक्रियेवर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदुषण मंडळ यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार धुळे मनपात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत वरखेडी रोड येथे कचरा संकलन प्रकल्प उभारण्यात आले आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० च्या मार्गदर्शक सुचनेनुसार धुळे मनपाच्या शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार शहरातील रोज संकलीत होणाऱ्या १५० ते २०० मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार ईंदाई रिसायकल्स यांना वार्षिक रु. ४,०८,०२,४०१/- या दराने कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरचा खर्च त्यांनी स्वखर्चाने ४ कोटी रु. गुतवणुक करुन १५० मेट्रीक टन प्रति दिवस श्रेडो या नामांकित कंपनीची मशिनरी बसवुन प्रकल्प कार्यान्वित केला आहे. प्रकल्पात आतापर्यंत १०८३६ मेट्रीक टन कचऱ्यावर ४ महिन्यात प्रक्रिया करण्यात आली आहे. संस्थेचे काम समाधानकारक असुन पर्यावरणाच्या दृष्टीने सातत्य राखणे गरजेचे आहे. त्यांनी मुदतवाढीसाठी अर्ज सादर केला आहे. त्यानुसार सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — या विषयात देखील २ वर्ष मुदतवाढ देण्यात येत आहे. आणि तेथे ज्या राहिलेल्या गोष्टी आहे. जेनसेट चालु आहे त्याचे पैसे भरायला सांगितले आहे. तटटु साहेब तुम्ही तेवढे वर्कआऊट करुन द्यावे. बायोमायनिंग होत त्या साईडला कचरा टाकु नये. जेवढे एरिया करताय तेवढया एरियाचे जिओ टॅगिंग करावे. त्याशिवाय बिल अदा केले जाणार नाही. सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५९ दिनांक २२/०५/२०२५**

स्वच्छ भारत अभियान २.० च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि प्रक्रियेवर भर देण्यात आला आहे. धुळे महानगरपालिका ड वर्गात येत असुन शहराचे भौगोलीक क्षेत्रफळ १०१.०८ स्क्वेअर कि.मी. आहे. सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या ५ लक्ष एवढी आहे. आरोग्य विभागामार्फत शहरातील कचरा संकलन बाह्यस्त्रोत मार्फत करण्यात येत असुन सुमारे दररोज १२५ ते १५० मेट्रीक टन कचरा संकलीत केला जात आहे.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत धुळे शहरातुन दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सर्व्हे नं.२०७ येथे नागरी घनकचरा अधिनियम २०१६ ची अंलबजावणी करण्याकामी कचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मार्गदर्शक सुचनांनुसार व मंजुर DPR च्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार शासकीय दरसुची सन २०२२-२३ नुसार रु.४,०८,०२,४०१/- खर्च येणार असल्याने १५ वा वित्त आयोगमधुन प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

उक्त रक्कमेच्या खर्चास सन २०२४-२५ या आर्थीक वर्षातील १५ वा वित्त आयोग निधीमधुन घनकचरा या लेखाशिर्षातुन भागविण्याबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. व त्यानुसार ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

ई-निविदा सुचना क्र.२५७ दिनांक ५/३/२०२४ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेत अनुक्रमे १) Indai Recyclers व २) Mayo Vessels and Machines Pvt.Ltd. यांची निविदा प्राप्त झाली होती. यात इंदाई रिसायकलर्स हे L-१ पात्र झाले असुन त्यांचे निविदा दर रु.४,०८,०२,४०१/- मात्र या दरात काम करण्याची तयारी दर्शवील्याने मे.स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.१७८ दिनांक १४/८/२०२४ अन्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांचे अंदाजपत्रकीय (सादर केलेल्या) दरास मान्यता दिलेली आहे. जा.क्र./धुमपा/बा.वि./१८२/२०२४ दिनांक ४/९/२०२४ अन्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांना कामाचे आदेश देण्यात आले आहे.

उक्त आदेशान्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी कार्यआदेशात नमुद केल्याप्रमाणे सर्व्हे नं.२०७ येथे कचरा प्रक्रिया केंद्राच्या शेड १ व २ मध्ये १५० मेट्रीक टन प्रती दिवस प्रक्रिया करण्याच्या क्षमतेचे श्रेडो या नामांकित कंपनीचे मशिनरी बसविण्यात आली आहे सदर मशिनरी उभारणीसाठी मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी रक्कम रुपये ४ कोटी इतक्या रक्कमेची गुंतवणुक स्वखर्चाने केलेली आहे. सदर मशिनरी बसविण्यासाठी २ महिने कालावधी लागला नंतर उक्त मशिनरीसाठी आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्ध न झाल्याने मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी फेब्रुवारी-२०२५ पासुन शहरातील संकलीत होणाऱ्या दैनंदीन कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रावर दररोज शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे.

१४ फेब्रुवारी पासुन जनरेटरच्या सहाय्याने प्रकल्प कार्यान्वीत केला असुन इंदाई रिसायकलर्स यांनी आजपावेतो एकूण १०८३६.२५३ मेट्रीक टन कचऱ्याची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी इंदाई रिसायकलर्स यांनी स्वखर्चाने प्रकल्प उभारणी करुन चालविणे करिता संस्थेची १ वर्षासाठी निविदा मंजुर करण्यात आली आहे. महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरणावर होणारे परिणाम कमी करण्यासाठी विविध जनरेटर्सकडुन संकलीत होणाऱ्या कचऱ्यावर वर्गीकरण, पुनर्वापर आणि विल्हेवाट इ. घटकांचा समावेश असलेल्या दृष्टीकोणाची आवश्यकता आहे. निरोगी वातवरणात एक पुरक दृष्टीकोनाची आवश्यकता आहे. मानवी आरोग्यावर आणि पर्यावरणावर कमीत कमी प्रतिकुल परिणाम करुन सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे शहरातील निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी सदरच्या उपक्रमात सातत्य राखणे गरजेचे आहे. इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. ह्या कार्यरत संस्थेचे काम समाधानकारक आहे. त्यानुसार सदर संस्थेस मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (२.०) अंतर्गत धुळे शहरातील दैनंदीन संकलन होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी नियुक्त इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. या संस्थेस मागील कार्यादेश पूर्ण होण्याच्या मुदतीनंतर पुढील

दोन वर्ष मंजूर दरानुसार मुदतवाढ देणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१६० केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० कार्याक्रमा अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या खर्चात वाढ होत असल्याने सुधारित अंदाजपत्रके व आराखड्यास तांत्रिक तसेच इतर मान्यता घेणेस्तव शासनास सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य.अभियंता अमृत २.० वाढीव पाणी पुरवठयाची जी योजना आहे तीचे काम जवळपास ४० ते ४५ टक्के पर्यंत झालेले आहे. काम करतांना असे आढळले की, हनुमान टेकडीवरील केमिकल हाऊस तसेच विविध टाक्यांचे कंपाऊंड आणि काही वाढीव लाईनस हे मुळे अंदाजपत्रकात समाविष्ट नव्हते. जे काम करतांना लक्षात आले की हे घेणे खुप गरजेचे आहे. तर याचे ॲक्सेस सेव्हिंग बनवले आहे. मुळ काम १३४ कोटीचे होते व त्यात १५.०५ कोटी एवढी वाढ होणार आहे. हा जो प्रस्ताव आहे तो आपल्याला SLTC ला मंजुरीकरीता सादर करणेसाठी महासभेची मंजुरी आवश्यक होती म्हणुन सदरचा विषय सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक केमीकल हाऊसच्या पुर्वी काय घेतले होते.

मा.कार्य. अभियंता पुर्वी आपण त्या बिल्डींगची दुरुस्ती धरली होती. पण डीपमध्ये चेक करतांना आढळले की ते नविन बसविणे संयुक्तीक ठरेल. दुरुस्त करणे योग्य नाही. त्यात बऱ्याचदा गॅस दुरुस्ती असते. त्यावेळेस TCL वापरतो आणि ॲलम वापरतो तर ॲलमला केमिकल हाऊसमध्ये ठेवावा लागेल तो उघडयावर ठेवता येत नाही. रिपेअरचे ६० लाखाच्या आसपास कॉस्टींग होते. आणि वरचा स्लॅबपण ॲड केला त्यात उरलेल्या इमारतीचा असे पावणे दोन कोटी पर्यंत ते जाणार आहे. तयात ॲक्वाची टाकी ॲड केली आहे. काही टाक्यांना कंपाऊंड घेतले आहे. WTP चे कंपाऊंड आहे.

मा.मुख्य लेखाअधिकारी शासन आदेशाप्रमाणे करंट कॉस्टच्या ४५ टक्केच्या पुढे रिपेअरिंग जात असेल तर नविन करणे संयुक्तीक ठरते.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता कंपाऊंड वॉल बाकीचे सगळे धरले आहे. ऑटोमेशन चे काही राहिले का.

मा.कार्य.अभियंता ऑटामेशनचा वेगळा प्रस्ताव आहे. याचे TS करुन SLTC ला पाठवावे लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे CPDM ला पण जाईल त्यात इलेक्ट्रीक, मेकॅनिकल पार्टचे काय.

मा. कार्य.अभियंता यात इलेक्ट्रीकल व मेकॅनिकलचाही पार्ट आपण समाविष्ट केला आहे. यात केबल व ट्रान्सफॉर्मर सोलरचे हे दोन आयटम घ्यावे लागतील.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे काम त्वरीत करावे लागेल. महिन्याभरात SLTC पर्यंत नेले पाहिजे. यात दोन यंत्रणा आहे. विद्युत विभाग व पाणीपुरवठा विभाग तुम्हाला स्वत:ला लक्ष द्यावे लागेल.आणि दोनही एकत्रित तेथे पोहोचल पाहिजे. UGD चे व हे पण सोबत चालेल असे पहावे. सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६० दिनांक २२/०५/२०२५**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेस रु.१७७,०८,६०,१००/- किमतीच्या सविस्तर अंदाजपत्रके व आराखड्यांना मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयातर्फे तांत्रिक मंजूरी प्रदान केली आहे. सदर योजनेच्या रु. १४२,७६,३२.९१८/- किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आली आहे.

सदर योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक या फर्मची नियुक्ती करणेत आलेली असून त्यानुसार सदर योजना उभारणीकामी पर्यवेक्षणाचे काम देखील करीत आहेत. सदर योजनेच्या स्थापत्य कामाची रु. ८८,३८.१८.५७६/- अंदाजपत्रकीय किंमतीची निविदा (GST वगळून) धुळे म.न.पा. तर्फे बोलविणेत आली होती. सदर योजनेची ई-निविदा प्रक्रिया धुळे म.न.पा. तर्फे पुर्ण करणेत आली असून त्यानुसार रु.१००,७५,५३.१७७/- रक्कमेची निविदा (GST वगळून) अंदाजपत्रकीय

दरापेक्षा १४% जादा दराने तसेच सन २०२१-२०२२ च्या दरसुचीनुसार व दरसुचीचे शुध्दीपत्रे तसेच शुध्दीपत्रका व्यतिरिक्त साहित्य, मजुरी व POL मधील निर्देशाकांत होणारी वाढ विचारात घेऊन चालु दरसुचीच्या मूल्यांकित किंमतीवर ९.९७२% जादा दराने नगरविकास विभागातर्फे निविदा स्वीकृत करून स्वीकृत निविदाधारक मे. जयदीप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई यांना संदर्भ क्र. ४ अन्वये कार्यादेश देणेत आले आहेत. सदर योजनेचा कालावधी १८ महिने म्हणजेच दि.१५/०९/२०२५ पर्यंत आहे.

अशाच प्रकारे योजनेतील यांत्रिकी व विद्युत कामासाठी रु. २९,७६,०८,३०२/- अंदाजपत्रकीय किंमतीची निविदा (GST वगळून) त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून रु.३३,१४,१६,६०५/- रक्कमेची निविदा (GST वगळून) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.३६% जादा दराने तसेच सन २०२१-२०२२ च्या दरसुचीनुसार मुल्यांकित किंमतीवर ७.९८% जादा दराने नगर विकास विभागातर्फे निविदा स्वीकृत करून स्वीकृत निविदाधारक मे. बडगुजर & कंपनी, नाशिक यांना संदर्भ क्र.५ अन्वये कार्यादेश देणेत आला आहे. निविदेचे काम पुर्ण करण्याचा कालावधी १८ महिने म्हणजेच दि.१५/०९/२०२५ पर्यंत आहे. त्यानुसार योजनेची कामे दोन्ही निविदाधारक यांचेमार्फत प्रगतीपथावर असून आजतागायत योजनेची स्थापत्य कामे ५०% व यांत्रिकी कामे १५% इतकी भौतिक प्रगती झाली आहे. तसेच योजनेवर आजतागायत दोन्ही निविदा मिळून एकूण रक्कम रु. ४२७४.३१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

मंजूर योजनेतील स्थापत्य कामे एकूण **८८३८.१८ लक्ष मात्र** व यात्रिकी व विद्युत कामे एकूण **२९७६.०८ लक्ष** मात्र ची आहे. स्थापत्य व यांत्रिकी कामे लक्षात घेवून योजनेची भौतिक प्रगती अंदाजे ४०%इतकी असून योजनेवर आजतागायत एकूण रक्कमरु. ४२७४.३१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सदर योजनेतील स्थापत्य कामाच्या निविदा १४%वाढीव दराने मंजूर असून यांत्रिकी कामाच्या निविदा११.३६%वाढीव दराने मंजूर आहेत. तसेच खाली दर्शविलेली योजनेत विविध उपांगामध्ये होणारी वाढ लक्षात घेता मंजूर योजनेवर एकूण रू.१५०५.००लक्षइतकी वाढ होतअसल्याचे दिसून येत आहे. सदरची वाढ लक्षात घेवून रु.१५७८१.३६लक्ष किंमतीचे सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेत आले आहे. मंजूर योजनेवर ही वाढ१०.५४%इतकीआहे. योजनेच्या खर्चात उपांगनिहाय वाढ होण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

1. दरसुचीत बदल झाल्यामुळे योजनेच्या निविदा ह्या निविदा किंमती पेक्षा खाली नमूद केल्यानुसार जादा दराने स्वीकृत करावी लागली.
   A)स्थापत्य कामे -रु.१४%वाढीव दराने
   B)यांत्रिकी कामे - रु.११.३६%वाढीव दराने

२. उंच जलकुंभ - खालील उंच जलकुंभ जागेच्या उपलब्धतेनुसार जास्त क्षमतेचे बांधावे लागत आहे. तसेच काही जलकुंभ नियोजित ठिकाणी जागेअभावी महानगरपालिकेच्या इतर पर्यायी जागेत बांधावे लागत आहे.

| **अ.क्र.** | **नियोजित उंच जलकुंभ ठिकाण** | **क्षमता (लक्ष लिटर)** | **पर्यायी उंच जलकुंभ ठिकाणी** |
|---|---|---|---|
| १ | चित्तोड गावठाण | १.८० | नगावबारी परिसर |
| २ | आदर्श नगर | ९.५० | धान्य गोदाम परिसर |
| **अ.क्र.** | **नियोजित उंच जलकुंभ ठिकाण** | **क्षमता (लक्ष लिटर)** | **पर्यायी उंच जलकुंभ ठिकाणी** |
| ३ | आधार नगर | ५.६५ | सुरत बायपास परिसर |
| ४ | बडगुजरनगर | ८.४० | सदर ठिकाणी मंजूर १७.१० लक्ष लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणेचे नियोजन आहे.<br><br>तसेच चाळीसगांव रोड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जवळ नवीन ३.१५ लक्ष लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणेचे नियोजन आहे. |

i) अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्र (हनुमान टेकडी - क्षमता१८द.ल.ली.) दुरुस्तीमध्ये केमिकल हाऊस नव्याने बांधावे लागत आहे. त्यामुळे सदर उपांगातवाढीव खर्च अपेक्षित आहे.

ii) सोलर कामांसाठी खालीलप्रमाणे वाढीव कामे करावी लागत आहे. ज्याची तरतूद मूळ मंजूर योजनेत नाही.
सोलरचे उपांगात १२०० Kva क्षमतेचा नवीन ट्रान्स्फार्मर, ३३ Kv६३०-amp चे Vaccum Circuit Breaker, अल्युमिनियम केबल, Touch Proof Termination Kit, Copper & G.I. Earthingया बाबींचा नव्याने समावेश करावा लागल्याने सदर उपांगातवाढीव खर्च अपेक्षित आहे.

iii) प्रस्तावित उंच जलकुंभांसाठी तारकुंपणाची तरतूद केलेली आहे. तथापि, महानगरपालिकेच्या मागणीनुसार अस्तित्वातील व प्रस्तावित उंच जलकुंभांसाठी तसेच सुखवद व बाभळे येथे सोलर प्लांटकरीता वीट बांधकामातील कुंपणाची तरतूद केल्याने सदर उपांगातवाढीव खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त कारणांमुळे योजनेच्या खर्चात वाढ होत असून वाढीचे सविस्तर विविरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाबनिहाय तपशील | रक्कम रु. (कोटी) |
|---|---|---|
| १ | योजनेची मंजूर किंमत | १४२.७६ |
| २ | सुधारित योजनेची किंमत १८% GST सह | १५७.८१ |
| i) | निविदेची एकूण किंमत (स्थापत्य व यांत्रिकी)(८८.३८कोटी +२९.७६ कोटी) | ११८.१४ |
| ii) | स्वीकृत मंजूर निविदा दरामुळे होणारी वाढ<br>१) स्थापत्य कामे - १४% वाढीव दर<br>२) यांत्रिकी कामे- ११.३६% वाढीव दर | ०.००<br>०.००<br>**एकूण - ०.००** |
| **अ.क्र.** | **बाबनिहाय तपशील** | **रक्कम रु. (कोटी)** |
| iii) | स्वीकृत निविदेच्या २५% पर्यंत येणाऱ्या वाढीव परिमाणाची रक्कम | स्थापत्य कामे -५.८०<br>यांत्रिकी कामे -०.०२<br>**एकूण - ५.८२** |
| iv) | कलम-३८ अंतर्गत वाढीव परीमाणानुसार येणारी रक्कम | स्थापत्य कामे -४.९९<br>यांत्रिकी कामे - ०.००१५<br>**एकूण -४.९९१५** |
| v) | निविदेत समाविष्ट नसलेल्या मात्र आवश्यक असलेल्या कामाची (अतिरिक्त बाब) रक्कम | स्थापत्य कामे -८.९२<br>यांत्रिकी कामे - २.६७<br>**एकूण - ११.५९** |
| vi) | एकूण निव्वळ रक्कम | १३२.५१ |
| vii) | निविदेत होणारी बचत रक्कम | ६.३५ |
| viii) | एकूण निव्वळ रक्कम (viii = vi-vii) | १२६.१६ |
| ix) | १८% GST (viii वरील एकूण रक्कमेवर) | २२.७१ |
| x) | तांत्रिक तपासणी शुल्क 1% प्रमाणे | १.२६ |
| xi) | लेबर इन्शुरन्स 1% प्रमाणे | ०.१२७ |
| xii) | एकूण सुधारित योजनेची किंमत (xi = viii+ix+x+xi) | १५०.२६ |
| ३) | मंजूर योजनेपेक्षा लागणारी वाढीव रक्कम (२ - १) | १५.०५ |
| ४) | मंजूर योजनेपेक्षा जादा वाढीव रक्कमेची टक्केवारी | १०.५४% |

वरीलप्रमाणे सर्व बाबी लक्षात घेवून सुधारित योजनेचे अंदाजपत्रके व आराखडे, सदर कलम ३८ चा प्रस्ताव मे.निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांच्या मार्फत मान्यतेसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर प्रस्तावास म.जी.प्रा कडून सुधारित तांत्रिक मान्यता मिळविणे आवश्यक आहे. सुधारित तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करणे प्रस्तावित आहे.

उक्त बाबत वरीलप्रमाणे योजनेत सर्वसाधारणपणे रु.१५.०५ कोटी ( १८% GST सह ) वाढ होत असल्याने सदरील प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC ) कडे सादर करणे देखील आवश्यक असल्याने प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० कार्याक्रमा अंतर्गत धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या खर्चात वाढ होत असल्याने सुधारित अंदाजपत्रके व आराखडे याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सक्षम प्राधिकरण तसेच राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC ) कडे सादर करणेस मान्यता वाचा क्र. १ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**